प-३१

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## अनुज्ञापन खाते

**क्रमांक : अअ /24226 /लेखा, दि. 25.11.2016**

<u>वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन / अति.निर्मू.)</u>
एफ' ते 'टी' विभाग

विषय : मुंबई महानगरपालिकेचे विविध परवाने / अनुज्ञापत्रे मिळविण्यासाठीच्या अर्ज प्रपत्राचे सुलभीकरण.

संदर्भ : 1) एएमसी/पूर्व उपनगरे/डीबीडी/9508/जी दि.13.05.2015
2) एमजीसी/एफ/6835, दि.09.11.2015.

मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खात्यामार्फत महानगरपालिका अधिनियम 1888, कलम 394 अन्वये व्यापार / उदिम व साठे यासाठी, कलम 313 (1)(b)(c) अन्वये प्रक्षेपकांसाठी तर कलम 328/328A अन्वये व्यापारी जागेवर / व्यापारी जागेव्यतिरिक्त जाहिरातींसाठी अनुज्ञापत्रे व परवाने दिली जातात. ती प्राप्त करण्यासाठी जो अर्जाचा नमूना वापरात होता तो आणि त्यासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या यादीमध्ये सुलभीकरण करण्याचे आदेश मा. महानगरपालिका आयुक्त यांनी दिले होते. (संदर्भ क्र.1) त्या आदेशानुसार मा. उप आयुक्त (विशेष) यांच्या मार्गदर्शनाबर हुकूम संशोधन करून अर्जाचा नमुना व आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या यादीमध्ये सुलभीकरण करण्यात आले. त्यास संदर्भ क्र.2 नुसार महानगरपालिका आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

मा. महानगरपालिका आयुक्तांच्या मंजूरीनुसार कलम 394, कलम 313(1)(b)(c) व 328/328A अन्वये दिल्या जाणा-या अनुज्ञापत्रे/ परवानेसाठी सुलभीकरण केलेले अर्ज व त्यासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या याद्या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर नागरिकांच्या सेवाशीर्षकाखाली अनुज्ञापन खात्यांतर्गत सर्व नागरिक / व्यावसायिक / कारखानदार यांच्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. याप्रमाणेच सर्व संबंधित विभागीय कर्मचा-यांसाठी त्यांच्या दैनंदिन संगणकीय कामकाजाकरिता संबंधित कलमांतर्गत CFC Check list मध्ये सुलभीकरण केलेल्या आवश्यक कागदपत्रांची यादी उपलब्ध करून देण्यात आली आहे

तद्अनुषंगाने सर्व वरिष्ठ निरीक्षक यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी Checklist मध्ये दिलेल्या कागदपत्राच्या आधारे अनुज्ञापत्रे, परवाने पक्षकारांना दयावेत.

वरिष्ठ निरीक्षक (अनुज्ञापन) यांनी वरील निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

24/11/16
अनुज्ञापन अधीक्षक

L1/E:\Forms- As per Act\परिपत्रक-सुलभीकरण अर्ज.